**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक १० फेब्रुवारी २०२५**

**ठळक बातम्या**

1. **पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'परीक्षा पे चर्चा' मधून साधला विद्यार्थ्यांशी संवाद, देशभरातून ५ कोटींचा सहभाग.**
2. **केंद्रीय आरोग्य मंत्री जगत प्रकाश नड्डा यांनी आज लिम्फॅटिक फिलेरियासिस निर्मूलनासाठी वार्षिक राष्ट्रव्यापी सामूहिक औषध प्रशासन मोहीम केली सुरू.**
3. **विदर्भ कौशल्य विकास विद्यापीठासाठी शंभर एकर जागा देण्यात येणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची औद्योगिक महोत्सवात घोषणा.**
4. **मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेच्या संकल्पनेबाबद माहिती देण्यासाठी महावितरण अधिकारी घेणार शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष भेटी.**

---------------------

**परीक्षा पे चर्चा**

**विद्यार्थ्यांनी परीक्षा देताना केवळ परीक्षेत गुण मिळवण्याचा विचार न करता संबंधित विषयावर प्रभुत्व मिळवण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावे असा सल्ला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी परीक्षा पे चर्चा कार्यक्रमात विद्यार्थ्यांना दिला. परीक्षेतले गुण, स्पर्धा आणि इतरांशी तुलना यापेक्षा विद्यार्थ्याची क्षमता, अंगभूत कौशल्य आणि कामातला आनंद या गोष्टींना महत्त्व दिलं पाहीजे, असं त्यांनी शिक्षक, आणि पालकांना सांगितंल. परीक्षेप्रमाणेच जीवनशैली विषयक अनेक प्रश्नांना मोदी यांनी उत्तरं दिली. पर्यावरण, कौटुंबिक नातेसंबंध अशा विविध विषयांचा त्यात समावेश होता. परीक्षेचा ताण हाताळण्याबद्दल पंतप्रधानांनी यावेळी चर्चा केली....**

***हमने अपने आप को एक तो किसी भी प्रकार के प्रेशर को झेलने के लिए सामर्थ्यवान बनाना चाहिए। मान के चलना चाहिए कि जीवन में आता रहता है दबाव को हमने अपने तरीके से इस स्थिति से जीतना है। एक तो संकल्प करना है।***

**परीक्षा पे चर्चा कार्यक्रमाचं स्वरुप आता बदललं असून तो ७ भागात सादर होणार आहे. आतापर्यंत बंद सभागृहात किंवा प्रेक्षागृहात होणारा हा कार्यक्रम**

आज नवी दिल्लीच्या सुंदर नर्सरीत झाडा फुलांच्यासोबतीने झाला. सुरुवातीलाच प्रधानमंत्र्यांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांना तिळगूळ देऊन गोड बोलायचा संदेश दिला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत शालेय विद्यार्थ्यांसोबत 'परीक्षा पे चर्चा' हा कार्यक्रम पाहिला. राज्याचे माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री तसंच मुंबई उपनगर जिल्हयाचे पालकमंत्री आशिष शेलार यावेळी उपस्थित होते. त्यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

*सुंदर अशा प्रकारचा हा कार्यक्रम माननीय पंतप्रधान मोदी दरवर्षी घेतात "परीक्षा पे चर्चा" यांच्या माध्यमातंन ह्या विद्यार्थ्यांशी त्यांचे संवाद साधत, त्यांच्या मनातील भीती त्यांच्या मनातल प्रेशर त्याच्यावरचे उपाय या चर्चेतन ते त्यांना सांगतात आणि एक प्रकारे जीवनाचा मंत्र हा विद्यार्थ्यांना या माध्यमातून मिळत असतो. यावेळी देखील वेगळ्या फॉरमॅट मध्ये हि चर्चा झाली. अतिशय सुंदर चर्चा झाली.*

अकोल्याच्या प्रभात किड्स शाळेतून पियुष देव याने आपला अनुभव सांगितला..

*मला खूप चांगलं वाटत होतं कारण की त्यांना लाईव्ह वरती बघणं एक खूप मोठी गोष्ट आहे कारण की ते आपल्या भारत देशाचे प्रधानमंत्री आहे मला खूप चांगलं वाटलं कि मी त्यांच्याशी काही प्रश्न विचारू शकलो कारण की ज्या मुलांनी काही प्रश्न विचारले त्यातले काही प्रश्न माझीसुद्धा होते आणि ते सुद्धा त्यांनी अचूक उत्तरे दिली. "परीक्षा पे चर्चा" या कार्यक्रमासाठी मी मोदीजींचे आभार व्यक्त करतो.*

---------------------

फ्रांस-अमेरिका दौरा

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज फ्रान्स आणि अमेरिकेच्या दौऱ्यावर रवाना झाले. फ्रान्सच्या दौऱ्यात ते उद्या होणाऱ्या कृत्रिम प्रज्ञा कृती परिषदेत सहअध्यक्ष म्हणून सहभागी होतील. कृत्रिम प्रज्ञेच्या वापरासाठी नैतिक आणि जबाबदार मार्गदर्शक सूचना तयार करणं यावर परिषदेत भर दिला जाणार आहे. मार्सेली इथल्या नवीन भारतीय वकीलातीचं उद्घाटनही त्यांच्या हस्ते होणार आहे. पंतप्रधान फ्रान्सच्या दौऱ्यात अनेक द्विपक्षीय बैठका, व्यावयासिकांसोबतच्या चर्चांमध्ये सहभागी होणार असून आंतरराष्ट्रीय थर्मोन्यूक्लीअर एक्सपरिमेन्टल रिऍक्टर या संस्थेला भेट देणार आहेत.

---------------------

जे.पी.नड्डा

केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जगत प्रकाश नड्डा यांनी आज दूरदृष्यप्रणाली द्वारे लिम्फॅटिक फिलेरियासिस (एलएफ) निर्मूलनासाठी वार्षिक राष्ट्रव्यापी सामूहिक औषधोपचार मोहीम सुरू केली. आपल्या भाषणात, नड्डा यांनी राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना राज्य पातळीवर मोहिमेचे निरीक्षण करण्याचे तसेच जिल्हा पातळीवरील राजकीय आणि प्रशासकीय नेतृत्वानेही घालण्याचे आवाहन केले.या उपक्रमाचे उद्दिष्ट लिम्फॅटिक फिलेरियासिसविरुद्धच्या भारताच्या लढाईला गती देणे आहे. नड्डा यांनी राज्यांच्या आरोग्य मंत्र्यांना निवडून आलेल्या प्रतिनिधींना, विशेषतः विधानसभा आणि परिषदांच्या सदस्यांना आणि पंचायती राज संस्थांना एमडीए उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात सक्रिय सहभाग घेण्यास प्रोत्साहित करण्यासाठी सहभागी करून घेण्याची विनंती केली.

---------------------

सुरक्षित इंटरनेट दिन

सुरक्षित इंटरनेट दिन दरवर्षी फेब्रुवारी महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी जगभरात साजरा केला जातो. यंदा हा दिवस उद्या, मंगळवार, दि. 11 फेब्रुवारीरोजी 'Together for a Better Internet' या थीमखाली साजरा होत आहे. लहान मुले आणि तरुणांमध्ये इंटरनेटच्या सुरक्षित आणि जबाबदार वापराविषयी जागरूकता वाढवणे हा या दिनाचा मुख्य उद्देश आहे. आजच्या काळात शासकीय कामात सायबर सुरक्षेचे महत्त्व वाढले आहे. त्यामुळे राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र (NIC) आणि अमरावती जिल्हाधिकारी कार्यालय यांनी 'Secure Your Accounts' ही मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेत सरकारी कार्यालय, बँक, खाजगी संस्था आणि नागरिक यांना त्यांच्या ऑनलाइन खात्यांच्या सुरक्षेबद्दल माहिती दिली जाणार आहे.

---------------------

कौशल्य विकास विद्यापीठ

विदर्भातल्या स्थानिक तरुणांना विविध कौशल्यांचं प्रशिक्षण देणाऱ्या विदर्भ कौशल्य विकास विद्यापीठासाठी शंभर एकर जागा देण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी केली. नागपूर विद्यापीठ परिसरात काल खासदार औद्योगिक महोत्सवाच्या समारोप समारंभात ते बोलत होते. आज विदर्भातल्या प्रत्येक क्षेत्राचा विकास होत असून त्या क्षेत्रांना व्यासपीठ देण्याचं काम या महोत्सवाने केल्याचं फडणवीस म्हणाले. खासदार औद्योगिक

महोत्सवाच्या दुसऱ्या आवृत्तीत विविध प्रकल्पांमधून साडे सात लाख कोटींची गुंतवणूक विदर्भात होत आहे. याशिवाय गडचिरोली जिल्ह्यात जगात सर्वात उत्तम दर्जाचे लोहखनिज असून यामुळे नजीकच्या जिल्ह्यात मोठमोठे उद्योग सुरु होतील, अशी अपेक्षा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केली.

---------------------

सौर कृषी पंप

सौर ऊर्जेचे महत्त्व आणि  मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेच्या संकल्पनेबाबद माहिती देण्यासाठी महावितरणचे वरिष्ठ अधिकारी आणि जैन एरिगेरियन सिस्टीम ली. तर्फ़े नागपुर परिमंडलातील विविध गावांतील शेतक-यांच्या प्रत्यक्ष भेटी घेण्यात येत आहे. मागेल त्याला सौर कृषी पंप योजने अंतर्गत सौर कृषी पंपाचे प्रात्याशिक दाखवून त्यामाध्यमातून शेतक-यांना सौर ऊर्जेचे महत्व कळावे यासाठी महावितरणच्या नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके आणि अधीक्षक अभियंता राजेश नाईक यांनी त्यांच्या विविध वरिषठ अभियंत्यांसमवेत शेतक-यांसोबत प्रत्यक्ष संवाद सुरु केला आहे. यांतर्गत सावनेर विभागातील कळमेश्वर उपविभाग अंतर्गत असलेल्या उपरवाही या गावात 3, 5 आणि 7.5 एचपी क्षमतेच्या सौर कृषी पंपाचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले.

---------------------

आंतरपरिमंडलीय क्रीडा

महावितरणच्या राज्यस्तरीय आंतरपरिमंडलीय क्रीडा स्पर्धेत नागपूर-चंद्रपूर-गोंदिया संघाने उत्कृष्ट प्रदर्शन करत अनेक स्पर्धांमध्ये विजेतेपद पटकावले. धावण्याच्या शर्यतीत 5, कॅरममध्ये 3 अजिंक्य पदांसह  ब्रिज, बुद्धिबळ आणि भारोत्तोलनमध्येही या संघाने बाजी मारली. या स्पर्धेत कोल्हापूर परिमंडल संघाने सर्वसाधारण अजिंक्यपद, तर पुणे-बारामती संघाने उपविजेतेपद मिळवले. बारामती इथल्या  विद्यानगरीच्या क्रीडा संकुलामध्ये महावितरणच्या चार दिवसीय राज्यस्तरीय स्पर्धेचा समारोप शनिवारी  झाला.

---------------------

उद्धव ठाकरे

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल आपल्याला मान्य नाही. नक्कीच यामध्ये गडबड घोटाळा झाला असल्याचा पुनरुच्चार  शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज केला. मुलुंड इथ महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेच्या राज्यस्तरीय अधिवेशनात ते बोलत होते. उद्धव

ठाकरे म्हणाले, शिक्षक मतदान करतात. त्यांच्यासाठी वेगळा मतदारसंघ तयार करण्यात आला आहे. तर त्यांना त्यांच्या आवडीच्या राजकीय पक्षाचा प्रचार करण्यात हरकत नाही असे सांगून शिक्षकांनी आता आपल्या फावल्या वेळेत शिवसेनेची सदस्य संख्या वाढवावी, असे आवाहन त्यांनी केले.

---------------------

**वेव्ह परिषद**

पहिली जागतिक दृकश्राव्य मनोरंजन परिषद म्हणजेच 'वेव्हज्' भारताला आशयनिर्मितीचे जागतिक केंद्र म्हणून उदयाला आणेल, असं केंद्रीय माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. सर्जनशीलतेचे शक्तीपीठ बनण्याच्या दृष्टीनं भारतात पाया रचला जात आहे, असं त्यांनी सांगितलं. वेव्हज् परिषदेच्या निमित्तानं जगभरातल्या माध्यम क्षेत्रातल्या अव्वल कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, मनोरंजन विश्वातले दिग्गज, सर्जनशील विचारवंत एकाच व्यासपीठावर येतील, असं ते म्हणाले.

---------------------